# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी
महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता. जि. ठाणे 40101.
दुरध्वनी क्र. 022-28192828/28193087.


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र.मनपा/आस्था/ 203 /2022-23 दि. 28/04 /2022

**तात्काळ/महत्वाचे**

प्रति,
सर्व विभागप्रमुख/खातेप्रमुख,
मिरा भाईंदर महानगरपालिका.

विषय :- रविवार दि.01 मे,2022 रोजीच्या उत्कृष्ट कर्मचाऱ्यांच्या सत्कार समारंभाच्या अनुषंगाने माहिती सादर करणेबाबत.

संदर्भ :- जा.क्र.मनपा/आस्था/182/2022-23, दि.26/04/2022 रोजीचे परिपत्रक.

रविवार दि.01 मे,2022 रोजी महाराष्ट्र दिनानिमित्त मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या प्रांगणात ध्वजारोहणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. सदर प्रसंगी वर्ग-3 व वर्ग-4 मधील उत्कृष्ट कर्मचाऱ्यांचा सत्कार समारंभ आयोजित करण्याचे ठरविले आहे.

त्यानुसार आपल्या विभागातील उत्कृष्ट कर्मचाऱ्याचे नाव भ्रमणध्वनीसह आस्थापना विभागात विनाविलंब सादर करणेबाबत संदर्भिय परिपत्रकान्वये आपणांस कळविण्यात आलेले होते.

अद्यापपर्यंत माहिती अप्राप्त असल्याने सदर कार्यक्रमासाठी संबंधीत कर्मचाऱ्यांची नावे सादर करणेस विलंब होत आहे. तरी आज दि.28/04/2022 रोजी दु.12.00 वाजेपर्यंत माहिती आस्थापना विभागात ई-मेलद्वारे/हार्ड कॉपीद्वारे सादर करण्यात यावी. माहिती सादर करण्यास विलंब झाल्यास संबंधीत विभागप्रमुख यांना जबाबदार धरण्यात येईल.

(सुनिल यादव)
सहा.आयुक्त (सा.प्र.)
मिरा भाईंदर महानगरपालिका